Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक

www. sahyandrinews.com

# सह्याद्रीचा राखणदार

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

Scan QR code to visit... Epaper Portal

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक २३९ • Title - Code :- MAHMAR49513 • रविवार दि.९ जून २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

## थोडक्यात

### कोरडवाहू शेतीला एकरी २५ तर बागायतीला ५० हजारांची मदत द्या

**मुंबई**–राज्यातील जनतेला दुष्काळाचे चटके बसत असताना त्यांना मदत करणे हे सरकारचे कर्तव्यच आहे पण सत्ताधारी पक्ष निवडणुका व राजकीय साठमारीत व्यस्त असल्याचे दिसत आहे. सरकारचे दुष्काळाकडे होत असलेले दुर्लक्ष पाहता राज्यपाल महोदयांनी या प्रश्नी लक्ष घालून जनतेला मदत देण्यासाठी पुढाकार घ्यावा. शेतकऱ्यांची अवस्था पाहता कोरडवाहू शेतीला एकरी २५ हजार रुपये, बागायती शेतीला एकरी ५० हजार रुपये तसेच फळबागांना एकरी १ लाख रुपये मदत तातडीने द्यावी. जनावरांसाठी चारा छावण्या सुरु कराव्यात व पिण्याच्या पाण्याची सोय करावी. खरीपाच्या पेरणीसाठी खते आणि बियाणे सरकारने पुरवावे अशी मागणी करत दुष्काळाचे गांभीर्य लक्षात घेऊन राज्य सरकारला निर्देश द्यावेत अशी मागणी महामहिम राज्यपाल यांच्याकडे केल्याची माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी दिली आहे.

### श्रीकांत शिंदे यांना मंत्री करण्याची मागणी

**मुंबई**–नरेंद्र मोदी सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेणार आहेत. त्यांच्या मंत्रिमंडळात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला देखील दोन मंत्रिपद मिळण्याची शक्यता आहे. यामध्ये एक कॅबिनेट आणि एका राज्यमंत्रिपदाचा समावेश असेल. या दोन मंत्रिपदावर कोणाची वर्णी लागणार? याची चर्चा सुरू असतानाच एकनाथ शिंदे यांच्या निवडून आलेल्या खासदारांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पुत्र आणि नवनिर्वाचित खासदार श्रीकांत शिंदे यांना मंत्री करण्याची मागणी केली आहे.लोकसभा निवडणूक निकालानंतर आता केंद्रात सत्तास्थापनेच्या हालचाली सुरु आहेत. उद्या सायंकाळी नरेंद्र मोदी हे तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेणार आहेत. त्यांच्यासोबत भाजप आणि एनडीएमधील सहकारी घटक पक्षांचे खासदार देखील मंत्रिपदाची शपथ घेतील. यात शिवसेनेच्या वाट्याला येणाऱ्या मंत्रिपदामध्ये श्रीकांत शिंदे यांचा समावेश करावा अशी मागणी शिवसेनेच्या सर्व खासदारांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे केली आहे. शिवसेनेचे खासदार नरेश म्हस्के यांनी ही सर्वांचीच इच्छा असल्याचे म्हटले आहे.

### पंकजांच्या पराभवानंतर धनंजय मुंडेंची खंत

**मुंबई**–पंकजा मुंडे यांचा पराभव झाला. तो आम्ही खुल्या मनाने स्वीकारला. मात्र, अजूनही बीड जिल्ह्यात खोटे व्हिडिओ पोस्ट करून जातीपातीमध्ये द्वेष निर्माण करणे सुरू आहे, अशी खंत शनिवारी धनंजय मुंडे यांनी व्यक्त केली. तसेच वातावरण दूषित करू नका, असे आवाहन त्यांनी केले.धनंजय मुंडे यांनी आज एक व्हिडिओ प्रसिद्ध केला. त्यात निवडणुकीनंतरही जिल्ह्यात कसे राजकारण सुरू आहे, त्यामुळे बीड कसे अशांत होत आहे. जातीपातीमध्ये कसा द्वेष पसरविला जात आहे, ते सांगितले. तसेच हे सारे बंद करा, असे आवाहन केले.

### मनोज जरांगे यांचे उपोषण सुरू

**मुंबई**–मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्या आमरण उपोषणाला आजपासून सुरुवात झाली आहे. पोलिसांकडून या उपोषणाला परवानगी नाकारण्यात आली आहे. मात्र तरीही मनोज जरांगे हे उपोषणावर ठाम आहेत. मी उपोषण करणारच असे जरांगे यांनी स्पष्ट केले आहे. तसेच प्रसार माध्यमांशी बोलतांना त्यांनी सगेसोयरेची अधिसूचना करण्याची मागणी केली आहे.यावेळी ''आता मराठा आरक्षण दिले नाही तर विधानसभेत मी स्वतः नाव घेऊन उमेदवार पाडणार असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला आहे. शिवाय मराठा आरक्षण न दिल्यास २८८ जागांवर उमेदवार उभे करणार. यामध्ये सर्व जाती धर्माच्या उमेदवारांचा समावेश असेल. मग यासाठी जबाबदार सरकार असेल.

# नवनीत राणांच्या पराभवा नंतर बच्चू कडूंचा मोठा निर्णय

## आम्ही विधानसभेत २५ उमेदवार उभे करणार, बडनेरा मतदारसंघात तर नक्कीच

**अमरावती (वृत्तसंस्था)–आमचा उमेदवार असता किंवा नसता याला काही अर्थ नाही. तुम्ही पाच वर्षात काय काम केलं ते आधी सांगा. कधी काम केलं नाही. लोकांच्या प्रश्नांना हात घातला नाही. अन् पराभूत झाल्यावर त्याचं खापर दुसऱ्यावर फोडायचं हे काही बरोबर नाही, असा टोला आमदार बच्चू कडू यांनी नवनीत राणा व रवी राणा यांना लगावला. तर राणा यांच्या पराभवानंतर आता बच्चू कडू यांनी आता एक मोठा निर्णय जाहीर केला आहे. तर त्यांचा हा निर्णय महायुतीचे व विशेष करून आमदार रवी राणा यांचे टेन्शन वाढवणारे आहे.**



येत्या विधानसभा निवडणुकीत आम्ही २० ते २५ जागांवर उमेदवार उभे करणार आहोत. अमरावती जिल्ह्यात उमेदवार देणारच आहोत. पण राज्यात इतर ठिकाणीही उमेदवार देणार आहोत, अशी घोषणा प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते तथा आमदार बच्चू कडू यांनी केली आहे. ते माध्यमांशी बोलत होते. बच्चू कडू यांच्या या निर्णयामुळे महायुतीचे टेन्शन वाढणार आहे.विशेषत: बच्चू कडू यांनी बडनेरा विधानसभेचा देखील उल्लेख केला. कारण, रवी राणा हे बडनेरा विधानसभा मतदारसंघातील आमदार आहेत. त्यामुळे त्यांच्या विरोधात उमेदवार देण्याचा निर्णय बच्चू कडू यांनी घेतला आहे. परिणामी रवी राणा आणि महायुतीचे टेन्शन वाढणार आहे.खासदार बळवंत वानखडे हे बँकेचे संचालक आहेत. त्यामुळे त्यांचं मी अभिनंदन केलं आहे. नवनीत राणा यांच्या जात प्रमाणपत्र बाबत न्यायालयाने चुकीचा निर्णय दिला. ही निवडणूक धर्मावर झाली. आम्ही शेतकऱ्यांच्या मुद्दावर निवडणूक लढलो. आमच्याच उमेदवारीमुळे नवनीत राणा पराभूत झाल्या यात फार तथ्यही नाही. भाजपने उमेदवारीला विरोध केला तरी उमेदवारी दिली त्यात रवी राणाची भाषा योग्य नव्हती. रवी राणा हे आम्हाला घरी येऊन मारण्याच्या धमक्या देतात आणि त्यांचं काम आम्ही करायचं का? एवढं अपमानित होऊन आम्हाला जगता येत नाही, असे बच्चू कडू म्हणाले.बच्चू कडू यांनी पराभव केला आहे असं वाटत असेल तर आपण कसे वागलो याच विचार करावा, असा सल्लाही बच्चू कडू यांनी रवी राणा आणि नवनीत राणा यांना दिला. अमरावतीचा उमेदवार आम्ही पाडला असं ते म्हणत आहेत. मग ते आम्हाला एनडीएच्या बैठकीचे निमंत्रण कशी देतील?, असा सवाल त्यांनी केला.

### तलाठी संवर्गातील ऑनलाईन बदली प्रक्रिया

# राज्यस्तरीय अभ्यास गटात चंद्रपूरच्या जिल्हाधिकाऱ्यांचा समावेश

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

शासन निर्णय २०२३ च्या अन्वये तलाठी संवर्गाची आस्थापना जिल्हास्तरावर निश्चित करण्यात आली आहे. त्या अनुसरून तलाठी संवर्गातील कर्मचाऱ्यांच्या बदल्या संगणकीय ऑनलाइन पद्धतीने करण्याबाबत कार्यपद्धती निश्चित करण्यात आली आहे . यासाठी राज्यस्तरीय अभ्यास गटाची स्थापना करण्यात आली असून या अभ्यास गटात चंद्रपूरचे जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांचा समावेश शासनाने केला आहे. याबाबतचा शासन आदेश ७ जून २०२४ रोजी निर्गमित करण्यात आला.



महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनिमय आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम – २००५ अधिसूचित करण्यात आलेला आहे. सदर अधिसूचनेतील कलम ४ नुसार शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्या सामान्यपणे वर्षातून केवळ एकदाच एप्रिल किंवा मे महिन्यात करण्यात येतात. त्या अनुषंगाने शासन अधिसूचना २५ मे २००६ मधील तरतुदी तसेच कर्मचाऱ्यांच्या बदलीच्या अनुषंगाने सामान्य प्रशासन विभागामार्फत वेळोवेळी सूचना निर्गमित करण्यात येतात. या सूचनांचा अभ्यास करून, तलाठी संवर्गातील बदल्या संगणकीय ऑनलाइन पद्धतीने राबविण्याबाबत सर्वसमावेशक कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी अभ्यास गट स्थापन करण्यात आला आहे. यात पुण्याचे विभागीय आयुक्त चंद्रकांत पूलकुंडवार अध्यक्ष म्हणून तर सदस्य म्हणून चंद्रपूरचे जिल्हाधिकारी विनय गौडा यांच्यासह अहमदनगरचे जिल्हाधिकारी सिद्धराम सालीमठ, जळगावचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, महसूल व वन विभागाचे सहसचिव संजय बनकर, अपर जिल्हाधिकारी तथा विशेष कार्य अधिकारी राजेंद्र मुठे, साताराचे उपजिल्हाधिकारी अभिषेक देशमुख यांचा सदस्य म्हणून तर या अभ्यास गटाचे सदस्य सचिव म्हणून पुणे विभागीय आयुक्त कार्यालयातील उपायुक्त (महसूल) यांचा समावेश करण्यात आला आहे. सदर अभ्यास गटाने सामान्य प्रशासन विभागाच्या २००६ मधील तरतुदी तसेच कर्मचाऱ्यांच्या बदलीच्या अनुषंगाने वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या सूचनांचा अभ्यास करून त्याबाबतचा अहवाल १५ दिवसांमध्ये शासनास सादर करायचा आहे, असेही शासन निर्णयात नमूद आहे.

# शावकासह बिबट्याचे दर्शन, आरडाओरडा अन् पलायन

**झडशी । वार्ताहर**

शेतात रक्षणासाठी (जागलीला) जात असलेल्या एका शेतकऱ्याला शावकासह बिबट दिसून आला. त्याने आरडाओरडा केल्याने गावातील नागरिक धावून गेले. नागरिकांच्या दहशतीने बिबट्याने त्याच्या शावकाला तेथेच सोडून पलायन केले.

एकट्या पडलेल्या शावकाला नागरिक गावात घेऊन गेले. ही घटना तालुक्यातील हिवरा गावातील कुहा शेतशिवारात उघडकीस आली.

माहितीनुसार झडशी परिसरातील हिवरा गावाजवळच्या मौजा कुऱ्हा शेतशिवारात अवधूत कुणघटकर यांच्या कालवडीचा पाच दिवसांपूर्वी बिबट्याने फडशा पाडला होता. बिबट्याची दहशत कायम असतानाच गुरुवारी रात्री सव्वाआठ वाजता राजू बांते हे त्याच्या मालकाच्या शेतात जागलीसाठी जात असताना त्यांना मध्येच शावकासह बिबट दिसून आल्याने तारांबळ उडाली. त्यांनी आरडाओरडा केल्याने स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. आवाज झाल्याने बिबट्याने घटनास्थळावरून पलायन केले. एकट्या पडलेल्या शावकाला नागरिकांनी उचलून गावात आणले. घटनेची माहिती वनविभागाला देण्यात



आली.

वनरक्षक ए. एम. ढाले त्यांच्या सहकाऱ्यांसह घटनास्थळी दाखल झाले. घटनाक्रम वरिष्ठांना सांगितला. बिबट्याच्या बछड्याला ताब्यात घेत वनपरिक्षेत्र अधिकारी ए. आर. आगाशे यांनी उपवनसंरक्षक शेपट व सह वनसंरक्षक पवार यांच्या मार्गदर्शनात वनपाल डी. जी. टाक, वनरक्षक ए. एस. सिद्दिकी व खोब्रागडे यांनी बछड्याला वर्धेच्या पीपल फॉर ॲनिमल येथे तपासणी करून बिबट आढळून आला त्या ठिकाणी सोडून दिले. शावकासह मादी बिबट परिसरात असल्याने नागरिकांत दहशत निर्माण झाली आहे.

# नाचणगावात आलेल्या वादळामुळे आर्थिक नुकसान



**पुलगाव। प्रतिनिधी**

नजिकच्च्या नाचणगाव येथे सायंकाळी सहा ते साडेसहाच्या सुमारास झालेल्या अतिवेगाच्या वाऱ्यामुळे, वादळामुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले.

लहानुजी नगर येथील शेख सत्तार यांच्या घरावरील वीस टीन पत्रे उडाली. त्यामुळे घरातील अन्नधान्याची नासाडी झाली. तसेच श्याम टावरी यांचे शेतमालाचे साठवणूक गोदामाचे काही भागाची छप्पर उडाले. त्यामुळे त्या गोदामात असलेल्या शेतमालाचे नुकसान झाले तसेच मीरा कॉलनी येथील मोठे वृक्ष उन्मळून पडल्याने दोन ते तीन विजेचे खांब कोसळले. एक खांब कारवर पडल्यामुळे कारचे नुकसान झाले. तीन ते पाच मिनिट चाललेल्या या जोरदार वाऱ्यामुळे वीज पुरवठा मात्र खंडित झाला.

नाचनगाव परिसरात रात्रपर्यंत विज पुरवठा खंडित करण्यात आला होता.रात्री १-३०ला विज पुरवठा सुरळीत करण्यात आला.वादळामुळे गोरगरीब जनतेचे घरदार, गॅरेज इत्यादीचे नुकसान झाले.पुलगाव नाचणगाव परिसरात जोरदार वादळामुळे नाचणगाव परिसरातील कित्येक लोकांच्या घराची छते आणि झाडे कोसळून कार,घरगुती साहित्य,विद्युत खांब इत्यादीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.झालेल्या नुकसानीचे तहसीलदार आणि पटवाऱ्यांनी जागेचे पंचनामे केले.नागरिकांचे या वादळामुळे भ मोठे नुकसान झालेले दिसून येत आहे. जिल्हा प्रशासनाने दखल घेऊन त्वरित गोरगरीब जनतेची मदत करावी, अशी मागणी आहे.

# सुरजागड रेस्क्यू टीमच्या अथक परिश्रमामुळे दहा जणांचा वाचला जीव

**गोंडपिपरी । प्रतिनिधी**

सुरजागड लोहखनिज प्रकल्पाचा सामाजिक चेहरा अनेक माध्यमातून समोर आला. अलीकडे अहेरी – गोंडपिपरी मार्गाची दुरवस्था झाली.त्यामुळे नागरिकांत असंतोष वाढला.याही परस्थितीत सुरजागड लोह प्रकल्पाने सामाजिक बांधिलकी जोपासत परिसरातील घडलेल्या अनेक घटनांवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला.काल दि (७)शुक्रवारी अहेरी आष्टी मार्गावर लग्नाच्या वरहाड्यांचा ट्रक अनियंत्रित झाल्याने उलटला.त्यामधे १५ ते २० लहान मोठ्या नागरिकांचा समावेश होता.त्या दरम्यान सुरजागडच्या सुरक्षा पथकाला घटनेची माहिती मिळाली.तात्काळ घटना स्थळ गाठून त्यांनी तेथील परस्थिती नियंत्रणात आणली.यावेळी त्यांनी सुमारे दीड ते दोन तास मदतीसाठी रेस्क्यू ऑपरेशन राबवून माणुसकीचा परिचय दिला.

गडचिरोली जिल्ह्यातील सुरजागड लोहखनिज प्रकल्पामुळे आदिवासी बहुल जिल्ह्याच्या विकासाची दारे खुलली.मात्र लगतच्या चंद्रपूर जिल्ह्यातील गोंडपिपरी तालुक्याला या प्रकल्पाचा फटका बसताना दिसत आहे .अशावेळी अहेरी गोंडपिपरी मार्गावर वाहतुकीचा प्रश्न निर्माण झाला. त्यामूळे अधून मधून अपघात सुधा घडताना दिसून येत आहे .अशावेळी सुरजागड प्रकल्पाचे मदत पथक क्टिव होऊन काम करीत आहे.दिवसरात्र डोळ्यात अंजन घालून त्यांचे पथक मानवीय



दृष्टिकोनातून जबाबदारी पार पाडताना दिसत आहे.अशाचतच काल घडलेल्या एका भीषण अपघातातून सुरजागडच्या गस्ती पथकाने दहा ते बारा लोकांचा जीव वाचिवला.झाले असे अहेरिकडून आष्टी च्या दिशेने वऱ्हाडी घेऊन येत असलेला ट्रक बोरी गावा जवळ उलटला.चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने मद्यरात्री हा प्रकार घडला.दरम्यान प्रकल्पाचे सुरक्षा पथकाचे प्रमुख विनोद कुमार यांच्या नेतृत्वातील टीम नेहमी प्रमाणे काल देखील कर्तव्यावर हजर होती.त्यांना या घटनेची कल्पना मिळताच तात्काळ ही टीम मोक्यावर हजर झाली.दरम्यान रात्री एक वाजतापासून घटनास्थळावर त्यांच्या रेस्क्यु ऑपरेशनला सूरवात झाली.विनोद कुमार यांच्या मार्गदर्शन व नियंत्रणात तब्बल दोन तासाच्या अथक परिश्रमानंतर ट्रक खाली दबलेल्या जखमी लोकांना बाहेर काढण्यात पथकाला यश आले.यानंतर कंपनीच्या रुग्णवाहिकेतून गंभीर जखमी राहिलेल्या चार रुग्णांना चंद्रपूर येथील जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी पाठिवण्यात आले.तर उर्वरित किरकोळ जखमींना आष्टी येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले.या रूग्नांसोबत स्वतः सुरजागड प्रकल्पाची टीम दवाखान्यापर्यंत हजर होती.यावेळी तातडीची मदत म्हणून कंपनीने जखमींना आर्थिक सहकार्य केले.दरम्यान परिसरातील सरपंच दिपक मडावी हा स्वतः या अपघातात जखमी झाले.त्यांनादेखील सूरजागड कंपनी व्यवस्थापनाने मदतीचा हात दिला.यातून एका मोठ्या अपघाताला सावरण्याचे कार्य घडले असून जीवितहानी देखील टळली.त्यामुळे कंपनी व्यवस्थापक व मदत पथकाचे नागरिकांनी आभार मानले.

# कामगार लढ्याचा इतिहास आणि रविवार!

**नारायण मेघाजी लोखंडे यांनी आठवड्यातील सातही दिवस राबणाऱ्या कामगारांकरिता साप्ताहिक सुटीसाठी लढा दिला, मागणी रेटून धरली, दि.९ जून १८९० रोजी ती मंजूर करून घेतली आणि दि.१० जून १८९० पासून रविवार ही साप्ताहिक सुट्टी म्हणून जाहीर झाली. जी आजपर्यंत चालू आहे. गिरणी कामगारांना रविवारी साप्ताहिक सुट्टी मिळावी. दुपारी, कामगारांना अर्धा तास सुट्टी मिळावी. या मागण्या मान्य करून घेतल्या. श्री कृष्णकुमार आनंदी–गोविंदा निकोडे गुरूजींचा हा संकलित महत्त्वपूर्ण लेख कष्टकरी वर्गाला सविनय समर्पित... संपादक.**

रविवार हा आठवड्यातील एक वार आहे. सोमवारपासून मोजला तर हा आठवड्यातील शेवटचा, म्हणजे सातवा दिवस येतो. भारतात हा वार रवीचा म्हणजेच सूर्याचा दिवस समजला जातो. त्यामुळे याला आदित्यवार (आदित्य=सूर्य) किंवा बोली भाषेत आइतवार म्हंटले जाते आणि इंग्रजीत संडे. ज्या ज्या देशावर कधी काळी ब्रिटिश सत्ता होती, त्या त्या देशात रविवार हा सुट्टीचा दिवस असतो. शिक्षणसंस्था, कार्यालये आणि बँका या दिवशी बंद असतात.

एके काळी भारतात कामगारांना रविवारची सुट्टी नसे. नारायण मेघाजी लोखंडे यांनी मुंबईत इ.स.१८८४मध्ये बॉंबे मिल हँड्स ही भारतातली पहिली कामगार संघटना स्थापन केली. त्यांनी त्या काळच्या फॅक्टरी कमिशनकडे अनेक मागण्या केल्या. त्यातली रोजच्या कामातली अर्ध्या तासाची जेवणाची सुटी आणि रविवारची साप्ताहिक सुट्टी या दोन महत्त्वाच्या मागण्या होत्या. त्यासाठी दि.२४ एप्रिल १८९० रोजी हजारो कामगारांचा मोर्चा निघाला होता. अखेर दि.९ जून १८९० रोजी प्रस्तावाला मंजूरी देवून दि.१० जून १८९० पासून दर रविवारची सुट्टी देण्याचे गिरणी मालकांनी सुरू केले. सन २०१५ साली १० जूनला या रविवारच्या सुट्टीचा १२५वा वर्धापन दिन साजरा झाला. पुण्यात रविवार हा मिसळवार म्हणून ओळखला जातो. पाश्चात्त्य कल्पनेप्रमाणे आठवड्याचा पहिला वार परंतु व्यावहारिकदृष्ट्या शेवटचा वार. या वाराचे नाव बहुतेक सर्व देशांत सूर्यवाचकच आहे. भारतीय ज्योतिषशास्त्रीय कल्पनेनुसार या दिवशीच्या सूर्योदयापासून पहिल्या होऱ्याचा अधिपती सूर्य असतो. जगात सर्व ठिकाणी सूर्याला देवताच मानतात. जैन धर्मात नऊ वर्षे केले जाणारे एक व्रत आषाढमासाच्या शेवटच्या रविवारपासून पुढे ९ रविवार चालते. मुसलमान बांधव दर चांद्रमासातील पहिल्या रविवारी मंत्र–तंत्र करतात. काही ख्रिस्ती पंथ रविवार हा प्रभूच्या प्रार्थनेचा व विश्रांतीचा दिवस म्हणून पाळतात. येशू ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाचा साप्ताहिक स्मृतिदिन म्हणून सर्वच ख्रिस्ती लोक रविवार हा प्रार्थनेचा दिवस पाळतात. कॉन्स्टंटाइन या सम्राटांनी आज्ञापत्र काढून रविवार हा सुटीचा दिवस ठरविला. ईस्टरच्या अलीकडचा रविवार पामसंडे म्हणून प्रसिद्ध आहे. ख्रिस्तांचा जेरूसलेममध्ये विजयी प्रवेश झाला, तेव्हा त्यांच्या मार्गावर पामवृक्षाच्या फांद्या पसरल्या होत्या. म्हणून याला पामसंडे म्हणतात. रविवार विशेष शुभ मानला जात नसल्याने कोणताही उपक्रम या दिवशी सुरू करीत नाहीत. मात्र या दिवशी दृष्टिदोष दूर करणारी



संकलन व सुलेखन
श्री कृष्णकुमार गो. निकोडे गुरुजी.
पोटेगावरोड, गडचिरोली,
फक्त मधुभाष– ७१३२७९६६८३.

यंत्रे वापरून उपचार करण्यास हरकत नसते, असे मानतात.रावबहाद्दुर नारायण मेघाजी लोखंडे (१८४८–१८९७) हे भारतातील कामगार संघटना चळवळीचे जनक होते. १९व्या शतकात कापड गिरणीच्या कामगारांची परिस्थिती सुधारण्यासाठीच नव्हे तर जातीय आणि सांप्रदायिक मुद्द्यांवर त्यांनी केलेल्या धाडसी पुढाकारासाठीही त्यांची आठवण ठेवली जाते. याशिवाय सन १८९५मध्ये हिंदू–मुस्लिमांदरम्यान झालेल्या दंगलीत केलेल्या कामाबद्दल त्यांना रावबहादूर ही पदवीही देण्यात आली होती. तत्कालीन ब्रिटिश भारत सरकारने त्यांना जस्टिस ऑफ पीस हा सन्मान देऊन सन्मानित केले होते. भारत सरकारने सन २००५मध्ये त्यांच्या छायाचित्रासह एक टपाल तिकीट जारी केले.


नारायण मेघाजी लोखंडे हे महात्मा जोतिराव फुले यांचे प्रमुख सहकारी होते. त्यांचा जन्म पुणे जिल्ह्यातील कण्हेरसर येथील माळी कुटुंबात झाला. त्यांचे शिक्षण हायस्कूलपर्यंत झाले होते. त्यांच्या पत्नीचे नाव गोपिकाबाई होते. गोपीनाथ नावाचा त्यांना एक मुलगा होता. सन १८७४मध्ये माहिती मिळाल्यानंतर ते सत्यशोधक चळवळीचे सदस्य झाले. सन १८८०पासून त्यांनी मुंबईहून प्रकाशित होणाऱ्या दीनबंधूचे व्यवस्थापन हाती घेतले. सुरुवातीस रेल्वे खात्यात कारकून म्हणून व पुढे पोस्ट खात्यात काही काळ नोकरी केल्यावर त्यांना मुंबईच्या मांडवी भागात एका कापड गिरणीत भांडारपालाची नोकरी मिळाली. तेथे त्यांना दहशतीच्या वातावरणात दिवसातून १३–१४ तास काम करीत असलेले गिरणी कामगार आढळले; त्यांना आठवड्याची सुट्टीही मिळत नसे; परिणामी लोखंडे यांनी नोकरी सोडून स्वतःस कामगार चळवळीस वाहून घेण्याचे ठरविले. त्याकरिता ते कामगार वस्तीतच राहू लागले. त्यांनी भारतातील पहिली कामगार संघटना बॉम्बे मिलहँड्स असोसिएशन दि.२३ सप्टेंबर १८८४ रोजी स्थापन केली आणि समाजसेवेत स्वतःला पूर्णपणे वाहून घेतले. नारायण मेघाजी लोखंडे यांना भारतातील ट्रेड युनियन चळवळीचे जनक म्हणून ओळखले जाते. त्यांच्यासह महात्मा फुले यांनी मुंबईतील कापड कामगारांच्या सभांनाही संबोधित केले. त्यांनी आठवड्यातील सातही दिवस राबणाऱ्या कामगारांकरिता साप्ताहिक सुटीसाठी लढा दिला आणि दि.९ व १० जून १८९०पासून रविवार ही साप्ताहिक सुट्टी म्हणून जाहीर झाली जी आजपर्यंत चालू आहे. एन.एम.लोखंडे यांच्यामुळे गिरणी कामगारांना मिळालेले काही हक्क हे होते– ✧ गिरणी कामगारांना रविवारी साप्ताहिक सुट्टी मिळावी.
दुपारी, कामगारांना अर्धा तास सुट्टी मिळावी. ✧ मिलच्या कामाला सकाळी साडेसहा वाजल्यापासून सुरुवात करावी आणि सूर्यास्तानंतर बंद करावी. ✧ कामगारांचे पगार दर महिन्याच्या १५ तारखेपर्यंत करावेत.ब्रिटिश राजवटीने त्यांना रावबहादूर ही पदवी बहाल केली होती. त्यांनी मुंबई कामगार संघ स्थापन केला. कष्टकरी वर्गाने एकजुटीने अन्यायाचा कडाडून प्रतिकार केला पाहिजे, अशी सशक्त प्रेरणाच ते आज ठरले आहेत. फुले व त्यांचे सहकारी कृष्णराव भालेकर आणि लोखंडे यांनी शेतकरी आणि कामगारांना संघटित करण्याचा प्रयत्न करण्यापूर्वी त्यांच्या तक्रारींचे निवारण करण्याचा प्रयत्न कोणत्याही संघटनेने केला नाही, हे विशेष!

!! रविवार साप्ताहिक सुट्टी मंजूर दिनाच्या सर्व कामगार बांधवांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !!

# छतावरचे पाणी देई ‘जलसमृद्धी’

तापमान वाढीचे चटके, पाणी टंचाईने कोरडे झालेले घसे यांच्यासह ‘नेमेची येतो पावसाळा’ म्हणत पुन्हा एकदा पावसाच्या वाटेकडे डोळे लावून बसलो आहोत. भर उन्हात पाण्याच्या टँकरची तिष्ठत प्रतिक्षा करणारे आपण; पावसाच्या जलधारांमध्ये चिंब भिजतांना सोसलेली पाणी टंचाई अशीच विरघळून जाऊ देणार आहोत का? याचे उत्तर नकारार्थी असेल तर आत्ताच वेळ आहे उठा आणि कामाला लागा. इकडे तिकडे कुठंही जाण्याची गरज नाही. आपल्याच घराच्या छतावर पडून वाहून जाणारे पावसाचे पाणी अडवून जमिनीत मुरवा. एरवी हे वाहून जाणारे पाणीच तुम्हा आम्हाला आणि पर्यायाने आपापल्या गावाला ‘जलसमृद्धी’ देणार आहे हे निःसंशय.

जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी पाणीटंचाई निवारणार्थ पावसाळ्यात वाहून जाणारे पाणी गावांतील विहीरी, बोअरवेल मध्ये साठवून जलपुनर्भरण करण्यासाठी ‘जलसमृद्ध गाव अभियान’ राबविण्याचे नियोजन केले आहे. यंदा जिल्ह्यात उन्हाळ्याच्या अखेरीस पाण्याची टंचाई भासली. या टंचाईच्या निवारणार्थ टँकरद्वारे पाणी पुरवठा करावा लागत आहे. ही वेळ पुन्हा येऊ नये आणि ‘पाण्यासाठी दाही दिशा’ अशी अवस्था होऊ नये यासाठी आत्ताच नियोजन करुन जलसमृद्ध गाव अभियानासाठी काम करणे गरजेचे आहे. त्यासाठी जलपुनर्भरण, पर्जन्यजल साठवण या सोप्या उपाययोजनांची माहिती या लेखाद्वारे देत आहोत.



पावसाळ्यात डोळ्यादेखत पूराचे पाणी वाहून जातांना बघणे आणि उन्हाळ्यात डोळ्यात पाणी आणून पाणी टंचाई पाहणे; ही परिस्थिती आज आपणा साऱ्यांवर आली आहे. एप्रिल महिन्यापासून तापमान वाढत आहे. भूजलपातळी खूप खोल गेल्यामुळे कूपनलिका व विहिरी कोरड्या पडल्या आहेत. पाण्यासाठी विंधन विहिरी तीनशे फूट खोल घेऊनसुद्धा पाणी लागत नाही. ही विपर्यस्त स्थिती टाळण्यासाठी भूजल पुनर्भरण हा रामबाण उपाय आहे.

पर्जन्यजल साठवण (Rain Water Harvesting) ही जलसंधारणाची एक अत्यंत साधी, सोपी व स्वस्त उपाययोजना आहे. पावसाचे पाणी जे एरवी वाहून जाते, ते अडवून जमिनीत मुरविण्याच्या अनेक उपाययोजना आहेत. आपल्या घर्च्या छतावर पडणारे पावसाचे पाणी एकत्र करण्यासाठी छपराच्या टोकाला अर्धनळी किंवा पन्हळ जोडून त्याद्वारे वाहत्या पाण्याला वाट देऊन पाईपद्वारे पाणी साठवण टाकी व तेथून गाळून हे पाणी विहीरी, कुपनलिका इ. मध्ये साठवून भूजल साठ्यात जमा केले जाते. थोडा इतिहास

अशा प्रकारे पर्जन्यजल साठविण्याची पद्धत फार प्राचीन काळापासून जलटंचाई प्रदेशात प्रचलित असल्याचा उल्लेख आढळतो. इ.स.पू. ३०० पासून बलुचिस्तान,अफगाणिस्तान, इराण आणि भारतामधील कच्छ, राजस्थानचा भाग या प्रदेशात या पद्धतीने पाणी संकलित करुन साठवून वर्षभर वापरण्याची प्रथा असल्याचे दिसून येते. इतकेच नव्हे तर भारतात प्राचीन काळात इ.स. १०११ ते १०३७ दरम्यान तमिळनाडू राज्यातील कडलोर जिल्ह्यात पर्जन्यजल साठविण्यासाठी जलकुंभ बांधल्याची नोंद आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या प्रत्येक गड किल्ल्यावर याच पद्धतीने खडकात टाके करुन त्यात पावसाचे पाणी साठवून हेच पाणी विहीरीतून वर्षभर उपयोगात आणल्याचे दिसून येते. अनेक गडकिल्ल्यांवर या उपाययोजना आजही अस्तित्वात असल्याचे पहावयास मिळते. तमिळनाडू राज्यात प्रत्येक घरागणिक पर्जन्यजल साठवण अनिवार्य केल्यामुळे गेल्या पाच वर्षांत तेथे पाणीटंचाईवर मात करुन चेन्नईमध्ये पर्जन्यजल पातळीत ५०% वाढ झाली आहे. उपयुक्तता पर्जन्यजल साठविल्यामुळे पाण्याची उपलब्धता वाढते शिवाय त्या प्रदेशातील जलसुरक्षा स्थितीत सुधारणा होते. पाणी टंचाईच्या काळात हा हमखास उपाय होय. एरवी पडणारा पाऊस जमिनीवरुन वाहून जातो, मात्र ह्या पद्धतीने वाहणारे पर्जन्यजल अडवून साठविल्याने ते जमिनीत पाझरते व भूजल पातळीत वाढ होते. पर्जन्यजल वाहून जाण्यास प्रतिबंध घातला जात असल्याने मातीचे कण वाहून जाण्यावर नियंत्रण येते व मृदा संधारणास मदत होते. पर्जन्यजल साठवून त्यावर संस्करण केल्यास ते पिण्यासाठीही वापरता येते. याशिवाय हे जल उद्योग, सिंचन, इतर घरगुती वापरासाठी, स्वच्छतेसाठी व बागकामासाठी वापरता येते.

कसे करावे जलपुनर्भरण घराच्या छतावर पडणारे पावसाचे पाणी पन्हाळी द्वारे अथवा पाईपाद्वारे एकत्र संकलित करावे. हे पाणी एका साठवण टाकीत घ्यावे तेथे त्यातील घाण कचरा, गाळ इ. स्थिरावल्यावर त्यातून हे पाणी गाळण टाकीत घ्यावे ह्या गाळण टाकीत दगड, वाळू, खडी व विटांचे तुकडे ह्यांच्या थरातून पाणी गाळले जाऊन ते विहीरीत अथवा बोअरवेल मध्ये सोडावे. जेणे करुन हे पाणी थेट रिक्त झालेल्या भुजल साठ्यात जमा होते.

पाण्याचे मोजमापअशा पद्धतीने आपण किती पाणी जमा करु शकतो किंवा ते जमिनीत मुरवू शकतो? ह्याचे साधे सुत्र आहे. वार्षिक सरासरी पाऊस द छपराचा जलधाव गुणांक द छपराचे क्षेत्रफळ = साठणारे एकूण पाणी. अशा प्रमाणात आपण पाणी जमा करुन ते साठवू शकतो, ते ही अगदी विनासायास. आपल्या छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचे वार्षिक सरासरी पर्जन्यमान ७३४ मिमी आहे. सिमेंटच्या छताचा जलधाव गुणांक हा ०.७ इतका असतो. तेव्हा आपण १०० चौ. मिटर क्षेत्रफळ असलेल्या भागात पडणारे पावसाचे पाणी साठवून तब्बल ५१ हजार लिटर्स हून अधिक पाणी साठवू शकतो.हे पाणी जमिनीत जिरवल्यास तितका भूजल साठा वाढवू शकतो. ही उपाययोजना प्रत्येक घरातून झाल्यास किती पाणी गोळा होईल? याची कल्पना केलेली बरी. मात्र ही कल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी गरज आहे ती कृतीची आणि वेळ आहे आत्ताच!

माहितीस्त्रोतः
१.जिल्हा अधीक्षक कृषी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
२.वरिष्ठ भूवैज्ञानिक, भुजल सर्व्हेक्षण व विकास यंत्रणा, छत्रपती संभाजीगर.
३.मराठी विश्वकोष,.

**डॉ. मिलिंद मधुकर दुसाने**
**जिल्हा माहिती अधिकारी**
**छत्रपती संभाजीनगर**

# सत्तेच्या उंबरठ्यावर गेलेल्या भाजपला आम्ही खाली खेचल्याशिवाय राहणार नाही–उद्धव ठाकरे



**मुंबई । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीसाठी ०४ जून ला मतमोजणी पार पडली. यामध्ये महाराष्ट्रात भाजपचा धुव्वा उडाला आहे. यात महाविकास आघाडीच्या काँग्रेस, उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांनी जवळपास ३० जागांवर विजय मिळवला आहे.यानंतर उद्धव ठाकरे यांनी डरकाळी फोडत भाजपला आता सत्तेत येऊ देणार नसल्याचे म्हटले आहे. ते पुढे म्हणाले की, एनडीए मध्ये असलेले अनेक पक्षही भाजपला कंटाळलेले आहेत. तेही आमच्याबरोबर येतील आणि यासह अनेक अपक्ष खासदार आमच्यासोबत येणार आहे. त्यामुळे सत्तेच्या उंबरठ्यावर गेलेल्या भाजपला आम्ही खाली खेचल्याशिवाय राहणार नाही. मतमोजणीमध्ये एनडीएला काठावरचे बहुमत मिळाले आहे. त्यामळे एनडीएतील चंद्राबाबू नायूडू आणि बिहारचे मुख्यमंत्री नीतीश कुमार यांचे देशाच्या राजकारणातील महत्त्व वाढले आहे. चंद्राबाबू आणि नीतीश यांनी प्रत्येकी जवळपास २० जागा जिंकल्या आहेत. त्यामुळे पुढचे सरकार कोणाचे येणार याच्या चाव्या त्यांच्या हातात आहे.या मुद्द्यावर बोलताना ठाकरे म्हणाले की, भाजपने चंद्राबाबू आणि नीतीश कुमारांना प्रचंड त्रास दिला आहे. त्यामुळे त्यांना पुन्हा असा त्रास नको असेल तर ते हे उंबरठ्यावरील सरकार येऊ देणार नाहीत.दरम्यान महाराष्ट्रात महाविकास आघाडीच्या माध्यमातून उद्धव ठाकरे यांची शिवसेना, शरद पवारांची राष्ट्रवादी आणि काँग्रेसने एकत्रित निवडणूक लढवली होती. यामध्ये या तिन्ही पक्षांनी दमदार कामगिरी करत भाजप आणि त्यांच्या सहयोगी पक्षांचा धुव्वा उडवला आहे.यामध्ये अनपेक्षितपणे काँग्रेस १३ जागा जिंकत राज्यातील सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. तर उद्धव ठाकरे ९ आणि शरद पवार यांच्या पक्षाने आतापर्यंत ८ जागा जिंकल्या आहेत.दुसरीकडे देशातही इंडिया आघाडीने दमदार कामगिरी केली असून भाजप आणि एनडीएला ३०० जागांच्या खाली रोखले आहे. एनडीए आतापर्यंत २९४ जागांवर आघाडीवर आहे. तर, इंडिया आघाडी २३५ जागांवर आघाडीवर आहे.सध्याची परिस्थिती पाहता एनडीएला सरकार स्थापन करण्यासाठी मोठी कसरत करावी लागणार आहे. भाजप गेल्या काही वर्षांत मित्र पक्षांबरोबर जशी वागत आहे ते पाहता सत्ता स्थापन करताना त्यांच्यासमोर मोठी आव्हाने असणार आहेत.असे उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषदेत सांगितले

# मराठा सेवा संघ महागाव तर्फे शिवराज्याभिषेक दिनी गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा थाटात संपन्न

**महागांव । प्रतिनिधी**

मराठा सेवा संघ महागाव तालुक्याच्या वतीने ६ जून शिवराज्याभिषेक दिना निमित्त नीट परीक्षेतील तसेच इयत्ता बारावी व दहावीतील गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्याचे आयोजन मातोश्री विद्यालय महागाव येथे करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सौ . सुनंदा दिलीपराव कोपरकर नगराध्यक्षा नगरपंचायत महागावप्रमुख मार्गदर्शक यशवंत देशमुख सर (राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श शिक्षक ),प्रमुख पाहुणे पत्रकार गजानन वाघमारे, संजय कोपरकर, पवन रावते, गणेश , राजू राठोड शिवसेना तालुका प्रमुख, सुरेशराव देशमुख,दिलीपराव कोपरकर, नानासाहेब देशमुख ,रमेश पवार, तेजस नरवाडे शिवसेना शहरप्रमुख,अमोल राजवाडे ,उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात राजमाता राष्ट्रमाता स्वराज्य संकल्पिका जिजाऊ माता व स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज तसेच शिवराज्याभिषेक दिनाच्या प्रतिमेचे पूजन व जिजाऊ वंदनेने करण्यात आली. मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. मान्यवरांच्या शुभहस्ते नीट परीक्षेत यश संपादन करणारे विद्यार्थी कु .कृतिका संजय गादेवार (६४६), कु. सृष्टी नानासाहेब देशमुख (६४५), जगन प्रल्हादराव कदम (५८१), इयत्ता बारावीचे तालुक्यातून प्रथम चिराग संदीप वट्टमवार (९२.१७), द्वितीय कु .कृतिका संजय गादेवार (९०.८३), इयत्ता दहावीचे तालुक्यातून प्रथम कु .प्रशांती गजानन नरवाडे (९७.२०), द्वितीय कु .श्रावणी किसन फटिंग (९६.२०) तसेच महागाव तालुक्यातील सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्रथम व द्वितीय ४५ विद्यार्थ्यांचा मराठा सेवा संघाची शिवधर्म दिनदर्शिका, गौरवपत्र, शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला व पुढील शैक्षणिक कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. गजानन वाघमारे व यशवंत देशमुख सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.संदीप शिंदे यांनी केले तर आभार प्रदर्शन अमोल जगताप यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मराठा सेवा संघाचे तालुकाध्यक्ष उदयभाऊ नरवाडे, सचिव पंकज देशमुख,जिल्हा सचिव डॉ. संदीप शिंदे, जिल्हा कार्यकारणी सदस्य अमोल जगताप, उपाध्यक्ष विठ्ठल वाघमारे, किशोर सोळंके, प्रतिष अडकिने, स्वप्निल नरवाडे, मंगेश वानखेडे, सोनू नरवाडे, विजय कदम, रवी भांगे यांनी प्रयत्न केले. या गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्यासाठी महागाव तालुक्यातील सर्व गुणवंत विद्यार्थी त्यांचे आई–वडील, शिक्षक व मराठा सेवा संघाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.



सह्याद्रीचा राखणदार



# राजधानी दिल्लीत सत्तेसाठी रस्सीखेच;इंडिया आघाडीच्या सायंकाळच्या बैठकीत पुढील रणनीती ठरणार–शरद पवार

**मुंबई (वृत्तसंस्था)**–लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर आज सायंकाळी राजधानी नवी दिल्लीत होणाऱ्या इंडिया आघाडीच्या बैठकीत पुढील रणनीती ठरवण्यात येईल, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी बुधवारी स्पष्ट केले. लोकसभा निवडणुकीचा निकाल मंगळवारी लागला. त्यानंतर एनडीए व इंडिया आघाडीमध्ये सरकार स्थापन करण्यासाठी जोरदार रस्सीखेच सुरू झाली आहे. राजधानीतील वेगवान घडामोडी पाहता शरद पवार बुधवारी सकाळीच दिल्लीत पोहोचलेत. ते सायंकाळी इंडिया आघाडीच्या बैठकीत सहभागी होतील. तत्पूर्वी, पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी विरोधी पक्षांच्या बैठकीनंतरच इंडिया आघाडीची पुढील रणनीती ठरवली जाईल असे स्पष्ट केले.शरद पवार म्हणाले की, मी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांचा फोन आल्यामुळे दिल्लीत आलो आहे. आम्ही अद्याप काही ठरवले नाही किंवा चर्चाही केली नाही. त्यामुळे या प्रकरणी जो काही निर्णय होईल तो सामूहिक होईल. मी आताच त्यावर काही बोलणार नाही. बैठकीनंतर सर्वांशी बोलूनच योग्य तो निर्णय घेतला जाईल.शरद पवार यांनी यावेळी काँग्रेस नेतृत्वाने आंध्र प्रदेशात चमकदार कामगिरी करणाऱ्या जदयु व तेदेपाशी संपर्क साधण्यास सुरुवात केल्याच्या वृत्तावर भाष्य करणे टाळले. काँग्रेसने तेदेपाल संदेश पाठवण्यास सुरुवात केल्याची आपल्याला कोणतीही माहिती नाही. नितीशकुमारांनी एनडीएतच राहण्याचे ठरवल्याचे मी वृत्तपत्रात वाचले. इंडिया आघाडीची ही दुसरी बैठक आहे. त्यामुळे पंतप्रधानपदाचा चेहरा कोण होणार यावर आत्ताच भाष्य करणे योग्य ठरणार नाही. आमच्यात चर्चा झाल्यानंतर पुढील रणनीती ठरवली जाईल. पण संख्याबळाकडे दुर्लक्ष करण्यात कोणताही अर्थ नाही, असे ते म्हणाले.शरद पवार यांनी महाराष्ट्रातील निकालावरही समाधान व्यक्त केले. जनतेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी नाराजी होते. मोदी सरकारला शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यात साफ अपयश आल्याचे या निकालावरून स्पष्ट होते, असे ते म्हणाले.उल्लेखनीय बाब म्हणजे लोकसभा निवडणुकीच्या मंगळवारी जाहीर झालेल्या निकालात ४०० पारची भाषा करणाऱ्या भाजपला मोठा झटका बसला. भाजपने गत २ लोकसभा निवडणुकांत स्वबळावर सरकार स्थापन केले होते. पण यंदा त्यांना सरकार स्थापन करण्यासाठी आवश्यक असणारा २७२ चा जादुई आकडा गाठता आला नाही. त्यांचा विजयरथ २४० जागांवरच रोखण्यात इंडिया आघाडीला यश आले. या परिस्थितीत भाजपला सरकार स्थापन करण्यासाठी नितीशकुमार यांच्या जदयु व चंद्राबाबू नायडू यांच्या तेदेपाची गरज भासणार आहे. यामुळे या दोन्ही पक्षांना गळाला लावण्याचा विरोधकांचा प्रयत्न आहे.



## कृषी आयुक्तालयाचा मोठा घोटाळा

# नॅनो डीएपी,नॅनो युरीया,मेटाल्डीहाईड किटक नाशकाची तीप्पट दराने खरेदी, काँग्रेसचा आरोप

**मुंबई (वृत्तसंस्था)**–कृषी आयुक्तालयाचा मोठा घोटाळा समोर आला आहे. नॅनो डीएपी व नॅनो युरीया, मेटाल्डीहाईड किटकनाशकाची तीप्पट दराने खरेदी सुरू असल्याची आमची माहिती आहे. या मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या भ्रष्टाचाराला कोणाचा आशीर्वाद आहे, असा संतप्त सवाल विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. या संपूर्ण प्रकरणाच्या चौकशीची मागणी करत त्यांनी याबाबत विधानसभेत आवाज उठविणार असल्याचा इशाराही त्यांनी यावेळी दिला.



विजय वडेट्टीवार म्हणाले की, महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्या. नॅनो डीएपी व नॅनो युरीया खते तयार करत नाही. त्यामुळे ही खते इफको कंपनीकडून कृषी आयुक्तालय थेट खरेदी करुन शेतकऱ्यांना त्याचे वाटप शकते. तरीही कृषी आयुक्तालयाने हा निधी महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मर्या. यांना वितरीत केला आहे. यामध्ये मोठा भ्रष्टाचार झाला असल्याची माहिती समोर आली आहे.

त्याचबरोबर महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ मेटाल्डीहाईड या किटकनाशकाची निर्मिती करत नाही. त्यामुळे या निविदांसाठी ऊद्द्ढ प्रणाली राबविण्याचे शासनाचे सक्त आदेश आहेत. तरीही महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळाला निधी वितरीत करून महामंडळाच्या मध्यस्थीमार्फत किटकनाशक विकत घेऊन मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केला जात आहे. ही दोन्ही प्रकरणे गंभीर असून या प्रकरणांची तातडीने चौकशी करा, अशी मागणी विजय वडेट्टीवार यांनी गुरुवारी केली आहे.विजय वडेट्टीवार म्हणाले की, शेतकऱ्यांना IFFCO ब्रँडचे नॅनो डीएपी व नॅनो युरीया अनुदानावर वाटप करण्यासाठी अनुक्रमे रू ११५.४९ कोटी रू.४३.३० कोटी असे एकूण रू. १५८.७९ कोटी शासनाकडून मंजूर करण्यात आले आहेत. शेतकऱ्यांना मेटाल्डीहाईड किटकनाशक वाटप करण्यासाठी २,५०,००० किलो पोटी रू. २५.१५ कोटी अनुदान मंजूर करण्यात आले आहे.खरेदीसाठी महामंडळाला शासनाकडून डव्हान्स प्राप्त झाले असता ३% सेवा शुल्क आकारण्यात येत होते, परंतु या बाबतीत महामंडळ १३% ते १३.२५% टक्के सेवा शुल्क आकारत आहे ही बाब अत्यंत चुकीची आहे. या प्रक्रिया बेकायदेशीर असल्याने तात्काळ रद्द कराव्यात. या प्रकरणांची सखोल चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही विजय वडेट्टीवार यांनी यावेळी केली आहे.

# फडणवीसांच्या राजीनाम्याच्या इच्छेवर दिल्लीत हालचाली

**मुंबई (वृत्तसंस्था)**–लोकसभा निवडणुकीत महायुतीला जबर फटका बसल्यानंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पराभवाची जबाबदारी स्वीकारत थेट राजीनामा देण्याचे संकेत दिले. यानंतर महाराष्ट्राच्या राजकारणात आता घडामोडींना वेग आला आहे. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर आता दिल्लीतही याबाबत हालचाली सुरू आहेत. गृहमंत्री अमित शहा यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना फोन केल्याची चर्चा आहे. त्यातच आज फडणवीस दिल्लीलाही जाणार असल्याची माहिती आहे.

राज्यात भाजपला फक्त ९ जागा मिळाल्या. यानंतर विरोधकांकडून सातत्याने फडणवीस यांना लक्ष करत ते पराभवाचे कारण असल्याची टीका केली जात होती. फडणवीसांनी त्यानंतर पत्रकार परिषदेत पराभवाची जबाबदारी स्वीकारली. यावेळी, ''संविधान बदल, मराठा आरक्षणाबाबत झालेल्या अपप्रचाराला उत्तर देण्यास आम्ही कमी पडलो, म्हणून आमचे नुकसान झाले. त्याची जबाबदारी मी घेतो. पण विधानसभेला आम्ही पुन्हा पूर्ण ताकदीने जनतेत जाऊ. त्यासाठी मी पक्षनेतृत्वाला विनंती करीन की पक्षसंघटनेत पूर्णवेळ काम करण्यासाठी मला सरकारमधून मोकळे करावे'' असे फडणवीस म्हणाले होते.त्यानंतर आता आज



ते दिल्लीत जाणार असून नरेंद्र मोदी आणि अमित शहा यांची भेट घेणार आहेत. मात्र त्यापूर्वीच गुरुवारी सकाळी अमित शहा यांनी स्वत: फडणवीस यांना फोन करून त्यांच्याशी चर्चा केली. फडणवीस यांची भूमिका शहांनी जाणून घेतल्याचे बोलले जात आहे. तसेच या मुद्यावर दिल्लीत आल्यावर, प्रत्यक्ष भेटीत चर्चा करू, असे शहांनी फडणवीसांना सांगितल्याची चर्चा आहे.त्यातच उद्या दिल्लीत भाजपची संसदीय पक्षाची बैठक आहे. त्यासाठी देवेंद्र फडणवीस दिल्लीत जाणार आहेत. या बैठकीत अमित शहा हे देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करतील. खरे तर राज्यातील प्रत्येक भाजप कार्यकर्त्याला, नेत्यांना फडणवीस यांचे नेतृत्व पाहिजे आहे. त्यामुळे फडणवीस यांच्या भूमिकेबाबत सविस्तर चर्चा होणार आहे.

# अजित पवारांचा बारामतीत मोठा डाव:कुस्तीगीर परिषदेच्या अध्यक्षपदावरुन युगेंद्र पवारांची उचलबांगडी

**पुणे (वृत्तसंस्था)**–अजित पवार यांच्या सांगण्यावरुन बारामती तालुका कुस्तीगीर परिषदेच्या अध्यक्षपदावरुन युगेंद्र पवार यांची उचलबांगडी करण्यात आल्याची माहिती समोर येत आहे.मिळालेल्या माहितीनुसार काल झालेल्या एका बैठकीला उपस्थित न राहिल्याने त्यांच्यावर ही कारवाई झाल्याची माहिती समोर येत आहे. तर निवडणूक संपताच युगेंद्र पवारांना हटवल्याने चर्चांना उधाण आले आहे. आता युगेंद्र पवार आणि शरद पवार गट काय भूमिका घेणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



युगेंद्र पवार म्हणाले की, मला काही सांगता येणार नाही. काही लोकांनी मला पण सांगितले की परवा कुठेतरी एक मीटिंग झाली. पण माझ्या कानावर आले पण माझ्यापर्यंत कुठल्याही ऑफिशियल चैनल कडून काय अजून माझ्याकडून काय पत्र किंवा असे काय आलेले नाही. तीन-चार वर्षांपासून कुस्ती संघाची जबाबदारी माझ्याकडे घेतली. त्याच्या आधी श्रीनिवास बापू ते बघत होते. चांगले काम केले आहे. तिथले पैलवान चांगली कामगिरी करत आहेत. त्यांना सोयी सगळे सुविधा देऊ शकलो. दादांनी पण तिथे खूप मदत केली आहे. दादांनी पण तिथं आम्हाला इमारतीला मदत केली. त्यामुळे पैलवानांना प्रोत्साहन मिळाले.युगेंद्र पवार हे अजित पवार यांचे थोरले बंधू श्रीनिवास पवार यांचे सुपुत्र आहेत. युगेंद्र यांच्या मातोश्री शर्मिला पवार या गेल्या अनेक वर्षांपासून शरयू फाउंडेशनच्या माध्यमातून सामाजिक क्षेत्रात कार्यरत आहे. या संस्थेच्या माध्यमातून बारामती व इंदापूर तालुक्यामध्ये अनेक सामाजिक उपक्रम राबवण्यात आले आहेत. युगेंद्र पवार राजकारणात सक्रिय होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. कारण ते गेल्या अनेक दिवसांपासून बारामतीतील विविध सार्वजनिक कार्यक्रमांना हजेरी लावताना पाहायला मिळतात.युगेंद्र पवार हे तीन वर्षांपासून महाऑरगॅनिक रेश्युड्युफ्री फार्मर्स असोसिएशन (मोर्फा) या सेंद्रीय शेती उत्पादकांच्या संघटनेचे अध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. शरद पवार यांच्या सूचनेनुसार सेंद्रिय शेतीमालाला बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी या संघटनेची स्थापना करण्यात आली आहे. या संघटनेच्या माध्यमातून सेंद्रिय शेती उत्पादकांचे अनेक वेळा मेळावेही घेण्यात आले होते. यानंतर बारामती तालुका कुस्तीगीर संघाच्या अध्यक्षपदी युगेंद्र पवार यांची निवड करण्यात आली आहे.

# सुनेत्रा पवार या माझ्यापेक्षा मोठ्या असल्याने त्यांच्याबद्दल मला आदरच-खा.सुप्रिया सुळे

**पुणे (वृत्तसंस्था)**–सुनेत्रा पवार या वयाने, नात्याने, मानाने माझ्यापेक्षा मोठ्या आहेत, त्यामुळे त्यांच्या बद्दल माझ्या मनात नेहमी आदरच आहे. वहिनीची मुले पार्थ व जय हे मला माझ्या मुलासारखेच आहे असे मत खासदार सुप्रिया सुळे यांनी गुरुवारी पत्रकरांनी निवडणुकीतील विजयानंतर सुनेत्रा पवार वहिनींचा फोन आला होता का? या प्रश्नावर मत व्यक्त केले.माझा विजय मतदारांचा व कार्यकर्त्यांचा आहे. मागील वर्ष हे संघर्षाचे होते. सहकाऱ्यांनी ज्या कष्ट केले ते पाहून मतदारांनी दडपशाहीला, तपास यंत्रणा गैरवापरास नाकारले असून संविधान चौकटीत देश यापुढे चालेल हे दाखवून दिले आहे. आता आमची जबाबदारी प्रचंड वाढलेली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्ष सुप्रिया सुळे यांची बारामती लोकसभा मतदारसंघातून पुन्हा खासदारपदी निवड झाली. या निवडणुकीत दणदणीत मिळालेल्या विजयानंतर प्रथमच सुप्रिया सुळे या मार्केटयार्ड येथील निसर्ग मंगल कार्यालय या त्यांच्या कार्यालयात नागरिकांना भेटीसाठी आल्या त्याप्रसंगी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला.खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या,माझी लढाई वैचारिक असून ती बेरोजगारी,भ्रष्टाचार, महागाई विरोधात आहे. दूध, भाजी, किराणा, सिलेंडर आदीच्या किंमती वाढल्याने जनता त्रस्त झाली आहे. दुष्काळाने शेतकरी हतबल झाला असून या केंद्र व राज्य सरकारने शेतकऱ्यांचे कंबरडे मोडण्याचे पाप केले आहे त्याविरोधात माझी लढाई आहे. लोकशाहीत प्रत्येकास निर्णय घेण्याचा अधिकार असून त्याला शुभेच्छा दिल्या पाहिजे. देशात बुध्दिवंताची कमतरता नाही असा टोला त्यांनी अजित पवारांना वेगळा पक्ष स्थापन केल्याबद्दल लगावला. लोकसभेत बहुमत मिळण्यासाठीचे आवश्यक संख्याबळ आमच्याकडे नसल्याने आम्ही सरकार स्थापन करण्यात सहभागी असणार नाही. यंदा मतदारांनी आम्हाला झुकते माप दिले आहे. त्यांनी जी संधी दिली, इंडियावर विश्वास दाखवला त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहे. उत्तरप्रदेश मध्ये अखिलेश यादव यांना चांगले यश मिळाले असून त्यांच्याशी माझी सविस्तर चर्चा झाली आहे. इंडियाला उत्तरप्रदेश मध्ये कितपत यश मिळेल याचे भाकित त्यांनी आधीच सांगीतले होते. हीच बाब पश्चिम बंगाल मध्ये ममता बॅनर्जी यांच्याबाबत दिसून आली. देशातील विविध राज्यातील नेत्यांशी आमचे बोलणे झाले असून वेट अँड वॉच भूमिकेत आम्ही आहे. भाजप सर्वात मोठा पक्ष निवडणुकीनंतर ठरला असून राष्ट्रपतींनी त्यांना पहिले आमंत्रण दिले आहे. मागील दहा वर्ष भाजपचे केंद्रातील सरकार मी जवळून पाहिले असून निवडणुक जुमला पाहिल्याने त्यांच्याबाबत गोष्टी माहिती आहे.नवीन चिन्ह तुतारीला पिपाणीचा निवडणुकीत फटका बसल्याचे दहा मतदारसंघात दिसून आले आहे. याबाबत सुळे म्हणाल्या, जर पिपाणी चिन्ह नसते तर आमची साताराची जागा देखील निवडून आली असती. सत्ताधारी यांचा रडीचा डाव आहे.

# पीक कर्ज वसुलीसाठी शेतकऱ्यांच्या बचत खात्यावर लावलेले होल्ड तात्काळ काढा

**पैठण । प्रतिनिधी**

शेतकऱ्यांनी शेतीसाठी राष्ट्रीयकृत बँकेकडून घेतलेले पिक कर्ज थकीत रक्कम वसुलीसाठी स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र, बँक ऑफ बडोदा, इ शाखेकडून शेतकऱ्यांना सक्ती केली जात असून बँकतील शेतकऱ्यांच्या सेव्हींग खात्यांना होल्ड लावले आहे. बँकेकडून होत असलेल्या या अडवणूकीमुळे शेतकऱ्यांना बँकेच्या खात्यावरुन व्यवहार करण्यासाठी अडचणी येत आहे. बँकेच्या अडवणूकीच्या धोरणामुळे ऐन खरीप हंगामाची तयारी करीत असतांनाच शेतकऱ्यांचे व्यवहार ठप्प पडल्याने शेतकऱ्यांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे.

याबाबत माहीती अशी की, तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी शेतीसाठी राष्ट्रीयकृत बँकेतून पिक कर्ज घेतलेले आहे. गेल्या काही वर्षापासून तालुक्यात अतिवृष्टी व अत्यल्प पावसामुळे दुष्काळ पडल्याने तालुक्यातील शेतकरी वर्ग मोठ्या आर्थिक संकटात सापडलेले आहेत. अशा बिकट परिस्थितीत बँकेकडून शेतकऱ्यांना ऐन खरीप हंगामाची लागवड कशी करावी या विवंचनेत असलेल्या शेतकऱ्यांना बँकेकडून पिककर्जाची थकीत रक्कम भरण्याची सक्ती केली जात असल्याचा प्रकार समोर येत आहे. शेतकऱ्यांनी पिककर्जाची थकीत रक्कम भरावी यासाठी बँकच्या अधिकाऱ्यांकडून शेतकऱ्यांचे बॅकेत असलेले खाते होल्ड करुन शेतकऱ्यांची अडवणूक केली जात आहे. गेल्या वर्षी तालुक्यात अल्प पावसामुळे दुष्काळाची परिस्थिती होती. दुष्काळाची परिस्थिती असल्याने पाठपुरावा करुन शासनाकडून तालुक्यात दुष्काळ सदृश्य परिस्थिती जाहिर करुन घेतली होती. दुष्काळ सदृश्य परिस्थिती जाहिर झाल्याने तालुक्यात विविध सवलती जाहीर करण्यात आल्या आहेत. यात शेतकऱ्यांच्या घेतलेल्या पिककर्जांच्या वसुलीला स्थगिती देऊन शेतकऱ्यांच्या कर्जाचे पुर्नगठन करावे असे आदेश दिलेले आहेत. शासनाच्या आदेशाला केराची टोपली दाखवत स्टेट बँकेचे अधिकारी मात्र पिक कर्जाची वसुली करण्यासाठी शेतकऱ्यांकडे तगादा लावत आहे. बँकेने अनेक शेतकऱ्यांचे खाते विनासुचना अचानक होल्डवर ठेवले आहे. बँकेच्या या शेतकरी विरोधी धोरणाचा फटका अनेकांना बसला आहे. याबाबत बँकत चौकशी करणाऱ्या शेतकऱ्यांना पिक कर्जाची थकीत रक्कम भरल्याशिवाय खाते अनहोल्ड केले जाणार नाही असे उत्तर बँकेच्या अधिकाऱ्यांकडून दिले जात आहे. बँकेच्या या अडेलतट्टू धोरणामुळे आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांचे सर्व व्यवहार ठप्प झाले असून बँकेच्या या कारभाराची चौकशी करुन संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करावी अशी मागणी छावा संघटनेचे अनिल राऊत यांनी तहसीलदार यांच्याकडे केली आहे व शेतकऱ्यांचे खाते अनहॉल्ड न केल्यास तीव्र स्वरूपाचे आंदोलनाचा इशारा यावेळी देण्यात आला आहे.यावेळी उपस्थित प्रदेश सरचिटणीस अनिल राऊत, मराठवाडा सचिव भगवान सोरमारे, ड. उद्धव नजन, ड. कल्याण बाबर, ज्ञानेश्वर तांगडे, सचिन गवारे, भाऊराव धरम, कृष्णा काळे, ज्ञानेश्वर घोरपडे आदी उपस्थित होते.



# तीन वर्षांपासून प्रलंबित गोवरी सेंट्रल परियोजना कार्यान्वयनाचा मार्ग अखेर मोकळा

## हंसराज अहीर यांच्या प्रयत्नाने चार गावातील शेतकऱ्यांना दिलासा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष तथा पुर्व केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहीर यांच्या विशेष पुढाकाराने अखेर वेकोलि बल्लारपूर क्षेत्रांतील गत ३ वर्षांपासून प्रस्तावित असलेल्या गोवरी सेंट्रल परियोजनेकरीता लवकरच सेक्शन ४ ची अधिसुचना जारी होत असून या प्रलंबित परियोजनेचा मार्ग प्रकल्पाचा कॉस्ट प्लस खरेदीदार करारनामा होवून मोकळा झाल्याने प्रकल्पग्रस्तांमध्ये आनंद व्यक्त होत आहे त्यांनी हंसराज अहीर यांच्या योगदानाबद्दल विशेष आभार मानले आहे. गोवरी सेंट्रल परियोजनेकरीता वेकोलिद्वारा अधिसुचना जारी करण्यास होणाऱ्या विलंबाबाबत भाजपा किसान आघाडीचे तत्कालीन जिल्हाध्यक्ष राजू घरोटे व ॲड. प्रशांत घरोटे यांच्या नेतृत्वात प्रकल्पग्रस्त ज्ञानेश्वर पिंपळकर, महादेव हिंगाने, अखिलेश लोनगाडगे, भुपेश जुनघरी, योगेश खोके, संजय उईके, पवन उईके, विठ्ठल भोयर, संतोष उईके, केतन खोके यांचेसह अनेक प्रकल्पग्रस्तांनी हंसराज अहीर यांची प्रत्यक्ष भेट घेवून गोवरी सेंट्रल परियोजनेच्या कार्यान्वयनातील अडसर दूर करण्याची मागणी केली होती.या मागणीची गंभीरपणे दखल घेवून या प्रकल्पातील बहुसंख्य ओबीसी शेतकरी व इतरांना न्याय मिळण्याकरीता ओबीसी आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर यांनी याप्रश्नी दि. २८ जून २०२३ रोजी वेकोलिचे सीएमडी, वरिष्ठ अधिकारी, बल्लारपूर क्षेत्राचे क्षेत्रीय महाप्रबंधक यांच्या संयुक्त बैठकीत सुनावणी घेवून गोवरी सेंट्रल परियोजनेच्या कार्यान्वयनातील अडसर दूर करण्याचे निर्देश दिले होते. रवीभवन नागपूर येथे तसेच जिल्हाधिकारी कार्यालय चंद्रपूर येथे मार्च २०२४ रोजी घेतलेल्या एनसीबीसीच्या सुनावणीत व यापूर्वी वेकोलि मुख्यालय नागपूर येथे झालेल्या बैठकीत या प्रकरणी तातडीने कार्यवाहीचे निर्देश जारी केले होते.राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाच्या निर्देशानुसार वेकोलि नागपूर मुख्यालयाने कोल इंडियाद्वारा गोवरी सेंट्रल परियोजने संदर्भातील प्रकल्प अहवाल (पीआर) मंजूर करवून घेत कोळसा खरेदी करीता दि. ०६ जून २०२४ रोजी एनटीपीसी व वेकोलि दरम्यान कॉस्ट प्लस व खरेदीदार करारनाम्यावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या आहेत. या करारामुळे आता गोवरी सेंट्रल परियोजनेच्या कार्यान्वयनातील अडसर दूर झाला असून लवकरच कोल बेअरींग एक्ट १९५७ नुसार भूमि अधिग्रहणाकरीता सेक्शन ४ ची अधिसुचना जारी करण्याकरिता क्षेत्रीय कार्यालयाव्दारे मंत्रालयीन स्तरावर प्रस्ताव पाठविण्यात येणार आहे. त्यामुळे वेकोलिच्या उदासिनतेमुळे मागील ३ वर्षापासून थंडबस्त्यात पडलेला गोवरी सेंट्रलचा प्रश्न मार्गी लागणार आहे. या उपलब्धीमुळे प्रकल्पप्रभावित चिंचोली, गोवरी, गोयेगांव, अंतरगांव, येथील शेतकऱ्यामध्ये आनंदाचे वातावरण आहे. प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांनी हंसराज अहीर यांचे व वेकोलि मुख्यालयाचे अभिनंदन करून विशेष आभार मानले आहेत.अहीर यांच्या प्रयत्नांमुळे वेकोलि प्रकल्पग्रस्तांचे मार्च २०२४ पासून खंडीत झालेले कॉउंसलिंग सुध्दा पूर्ववत सूरु करण्यात आले आहे.



# प्रहार जनशक्ती पक्षाने पुनर्वसना बाबत जिल्हाधिकारांना दिले निवेदन

### मागण्या येत्या काही दिवसात पूर्ण करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांनी दिले आश्वासन

**वरोरा । प्रतिनिधी**

प्रहार जनशक्ती पक्ष चंद्रपूर कडून अनेक विषयाला घेवून जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले .

रान तळोदी हे गाव ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात येत होते. त्याचे पुनर्वसन वरोरा तालुक्यातील परसोडा, खातोडा या गावाजवळ नवीन गाव बसवून काही लोकांचे पुनर्वसन झाले परंतु काही नागरिकांकडे सर्व कागदपत्रे असून सुद्धा ते या पासून वंचित होते या बाबत रान तळोदी येथील नागरिकांनी प्रहार जनशक्ती पक्षाचे जिल्हाप्रमुख शेरखान पठाण यांना भेटून सर्व माहिती दिली .प्रहार जिल्हाप्रमुख यांनी या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना भेटून सर्व माहिती दिली आणी जिल्हाधिकाऱ्यांनी लवकरच पुनर्वसनापासून वंचित राहिलेल्या बांधवाचा समावेश करण्यात येईल असे आश्वासन दिले. तसेच तळोधी नाईक तालुका चिमूर येथील बांधव वर्षानुवर्षे सरकारी जागेवर आपले कच्चे घर बांधून राहत आहे त्यांना पट्टे देण्यात यावे




ही मागणी जिल्हाधिकाऱ्यांना भेटून केली असता लगेच त्या संदर्भात आम्ही बैठक लावून प्रकरण निकाली लावू असे आश्वासन जिल्हाधिकारी यांनी दिले.

# राज्यात पुरोगामी संघटनेचे शिक्षक लावणार पन्नास हजार झाडे

## राज्य कार्यकारिणी सभा कणकवली येथे ठराव मंजूर

**मुल । प्रतिनिधी**

महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक संघटनेची राज्य कार्यकारिणी सभा कणकवली जि.सिंधुदुर्ग येथे राज्याध्यक्ष प्रसाद पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.प्रमुख अतिथी म्हणून राज्यनेते विजय भोगेकर ,राज्य सरचिटणीस हरीश ससनकर , राज्य कार्याध्यक्ष प्रकाश पाध्ये , राज्य उपाध्यक्ष जी एस मंगनाळे,राज्य महिला सरचिटणीस शारदा वाडकर , प्रकाश पाटील , राज्य कार्यकारी सचिव रंगराव वाडकर , राज्य महिला उपाध्यक्ष प्रेमीला माने यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली .

यावेळी सर्व राज्य जिल्हा पदाधिकारी यांनी पुरोगामी शिक्षक संघटनेच्या वतीने संपूर्ण राज्यभरात ५० हजार वृक्षांची लागवड करून त्याच्या संवर्धनाची जबाबदारी घेण्याचे एकमताने ठरविण्यात आले. त्यानुसार प्रत्येक तालुका कार्यकारिणीला १००ते २०० वृक्षांची



जबाबदारी निश्चित करण्यात आली . सदर सभेत प्रत्येक जिल्ह्यातील संघटनात्मक कार्याचा आढावा सादर करून शिक्षकांचे राज्यस्तरीय प्रश्न सोडविण्यासाठी एकमताने ठराव मांडले व शासनस्तरावर प्रश्न सोडविण्यासाठी भेट घेऊन निवेदन देण्याचे ठरविले.यावेळी सुरेश साळवी ,गोविंद पाटील ,सचिन जाधव ,एस के पाटील ,किशोर आनंदवार, इरफान मिर्झा ,महेंद्र हिवे,यशवंत पेंढारकर, संघर्ष सावरकर,प्रकाश वाडकर, प्रदिप पवार ,तुषार पाटील,गंगाधर बोढे,संभाजी पाटील ,नितीन पेढेकर ,जीवन भोयर ,गजानन चिंचोळकर सुभाष अडवे , किरण राठोड ,बालाजी हाळदे , देवराव अमोदे गोकुळ चारथळ ,लक्ष्मण खोब्रागडे,किशोर यनगंटीवार, शंकर सुरपाम,जगदीश ठाकरे,बाबा रणसिंग,नाथ मोरे ,मनोज पवार यांच्या सह अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

# पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण करून ओंकार चौगुले यांचा वाढदिवस साजरा

**सांगोला । प्रतिनिधी**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आपुलकीचे सदस्य सुरेशकाका चौगुले यांचे सुपुत्र ओंकार चौगुले यांच्या वाढदिवसानिमित्त आपलं समर्थनगर, (कडलास रोड) याठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले.

आपुलकी सदस्यांच्या वाढदिवसानिमित्त यावर्षी मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याचाच एक भाग म्हणून आपुलकी सदस्य सुरेशकाका चौगुले यांचे सुपुत्र ओंकार चौगुले यांच्या वाढदिवसानिमित्त पर्यावरण दिनाचे औचित्य साधून करंज या वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात



आले. याप्रसंगी आपुलकी प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजेंद्र यादव, सचिव संतोष महिमकर, अरविंद केदार, महादेव दिवटे, प्रा. डॉ. विधिन कांबळे,अरविंद डोंबे गुरुजी, इंजि. विकास देशपांडे, रविंद्र कदम, अण्णासाहेब मदने, अमर कुलकर्णी, प्रसन्न कदम, बंडू मारडे, अण्णासाहेब केदार, पांडुरंग केदार, शशिकांत केदार, सुनिल सावंत, नंदकुमार जाधव, सचिन शेळके, बबलू पाटील, ओंकार दिवटे, अक्षय डांगरे, सत्यजित पाटील, प्रभाकर इंगोले आदी उपस्थित होते.

# अखेर मान्सूनचे महाराष्ट्रात आगमन

**पुणे (वृत्तसंस्था)**–राज्यातील जनतेसाठी अत्यंत आनंददायी बातमी समोर आली आहे. अखेर नैर्ऋत्य मोसमी पावसाचे झालं आहे. याबाबतची माहिती हवामान खात्याच्या पुणे शाखेचे प्रमुख डॉ. होसाळीकर यांनी दिली आहे. नैर्ऋत्य मोसमी पाऊस कोकणातील रत्नागिरी, सोलापूर आणि पुढे मेडक, भद्राचलम विजयनगरम आणि त्यानंतर बंगालच्या खाडीपासून इस्लामपूरपर्यंत पोहोचल्याची माहिती होसाळीकर यांनी दिली आहे.

आज कोकणातील सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, सांगली आणि मराठवाड्यातील धाराशिव जिल्ह्यात पावसाची शक्यता आहे. तर पुढील चार दिवस राज्यातील बहुतांश भागात मेघगर्जना आणि वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसाचा अंदाज देण्यात आला आहे. दक्षिण कोकण, उत्तर कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात आज आणि उद्या पावसाचा इशारा देण्यात आला आहे.हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी ८ जून रोजी आणि रविवारी ९



जून रोजी सिंधुदुर्ग, कोल्हापुरात मुसळधार पाऊस पडण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. राज्याच्या अन्य भागांतही जोरदार पावसाची शक्यता आहे. रविवारपासून पुढील दोन दिवस मुंबईसह सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगडसह पश्चिम घाटात जोरदार पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. विदर्भासह राज्याच्या बहुतेक भागांत हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता आहे.

# पिकविम्याच लाभ शेतकऱ्यांना तात्काळ द्या;घरकुल धारकांना वाळू उपलब्ध करून द्या – शिवसेना उ.बा.ठा.ची मागणी

**मुल । प्रतिनिधी**

पिकविम्याचा लाभ अजूनही शेतकऱ्याना मिळाला नसून शेतकरी हवालदिल झाला आहे,तर दुसरी कडे घरकुल मिळाले पण वाळू उपलब्ध नाही म्हणून गोरगरीब उघड्यावर आहेत.आणि शासन प्रशासन मात्र सुस्त आहे.करिता शेतकरी आणि घरकुल धारकांना न्याय मिळवून देण्याकरिता ७ जून रोजी शिवसेना जिल्हा प्रमुख संदीप गीऱ्हे यांचे नेतृत्वात शिवसेना तालुका प्रमुख प्रशांत गट्टूवार यांनी शिवसेनेचे शिष्ट मंडळ घेऊन मुल तहसीलदार यांना भेटून निवेदन दिले.

राज्यभरात झालेल्या अवकाळी पावसाने तसेच सततचा दुश्काळी परिस्थीतीने शेतमालाला मोठयाप्रमाणात फटका बसला. शेतमालाला फटका म्हणजे शेतकऱ्याचे नुकसान झाल्या मुळे राज्य शासनाने सोयाबीन,कापूस,कडधान्य आदी पीकांना अवकाळी पावसाच्या फटक्याबाबत माहिती घेण्यासाठी महसुल आणि इतर संबधित विभागांना आदेश दिले .शासन आदेशान्वये यंत्रणा कामाला लागली. नुकसानग्रस्त भागात मौका चौकषी करून नुकसानीचा अहवाल बनविला गेला आहे. मात्र यात धान पीक सोडल्याने धानपीक उत्पादक शेतकरी अडचणीत सापडला आहे.अवकाळी पावसाचा फटका धान पीकालाही बसला आहे त्यामूळे काही भागात तर कापणी झाली असतांना बांधण्यापुर्वी धान शेतातच ओला होऊन सडुन गेला. मात्र प्रशासकीय अधिकाऱ्याच्या दुर्लक्षितपणामुळे शेतकर्यांना नुकसान भरपाई मिळालेली नाही. शासनाकडुन तातडीने शेतकर्यांना पिकविम्याचा लाभ मिळणे आवष्यक असल्याने आपल्यास्तरावरून कार्यवाही करण्यात यावी. त्याचप्रमाणे गरीब गरजु लोकांना शासनाने घरकुल मंजुर केले मात्र शासनाच्या चुकीचा धोरणुमुळे घरकुल लाभार्थ्यांना वाळु मिळत नसल्याने त्यांनी घरांचे बांधकाम कसे करावे संसार उघड्यावर पडला असून घरे कसे बांधावे असा प्रश्न निर्माण झालं आहे त्यामुळे आपण याबाबत ताताडीने आदेष करून घरकुल लाभार्थ्यांना वाळु लवकरात लवकर उपलब्ध करून दयावी.अन्यथा शिवसेना रस्त्यावर उतरून मोठया स्वरूपाचे आंदोलन करेल.असे यावेळी शिवसेना पदाधिकारी यांनी सांगितले.यावेळी शिवसेना शहर प्रमुख आकाश राम,विभाग प्रमुख चेतन मुंगमोडे,डोंगरगाव,विभाग प्रमुख रीतीक मेश्राम मारोडा,विभाग प्रमुख विनोद चलाख हळदी,महेश चौधरी, सुनीलकाळे माजी ता.प्र.अमित आयलानी युवासेना शहर प्रमुख,विजय शेंडे शाखा प्रमुख,चेतन जाधव नांदगाव,शोएब शेख आदी पदाधिकारी उपस्थित होते.




सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.

Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .